भारतीय रिज़र्व बैंक
RESERVE BANK OF INDIA
www.rbi.org.in

आरबीआय/२०१३-१४/५०

डीएनबीएस (पीडी) सीसी.क्र.३४८/०३.०२.००१/२०१३-१४ जुलै १, २०१३

सर्व एनबीएफसी

महोदय,

**महापरिपत्रक - अबँकीय वित्तीय कंपन्या घटक (रिझर्व बँक) निदेश, २०१२**

आपणास माहितच आहे की, ह्या विषयावरील सर्व विद्यमान सूचना एकाच जागी मिळाव्यात ह्यासाठी रिझर्व बँक, अद्यावत केलेली परिपत्रके/अधिसूचना देत असते. वरील विषयावरील जून ३०, २०१३ पर्यंत अद्यावत केलेल्या सूचना ह्या खाली दिल्या आहेत. अद्यावत केलेली ही अधिसूचना रिझर्व बँकेच्या वेबसाईटवरही (http://www.rbi.org.in) टाकण्यात आली आहे.

आपला

(एन एस विश्वनाथन)
प्रधान मुख्य महाव्यवस्थापक

**अनुक्रमणिका**


| परिच्छेद क्र. | तपशील |
|---|---|
| | प्रस्तावना |
| १ | लघुशीर्षक व सुरुवात |
| २ | हे निदेश लागु होणे |
| ३ | व्याख्या |
| ४ | पंजीकरण व त्यासंबंधित बाबी |
| ५ | निव्वळ निज निधी |
| ६ | मुख्य व्यवसाय |
| ७ | व्यवसाय चलन |
| ८ | प्रुडेशियल नॉर्म्स |
| ९ | रिर्टन्स सादर करणे |
| १० | आयात/निर्यात फॅक्टरिंग |
| ११ | संकीर्ण |

(१) **प्रस्तावना**

केंद्र सरकारने, जानेवारी २२, २०१२ रोजी फॅक्टरिंग रेग्युलेशन अधिनियम, २०११ अधिसूचित केला आहे. ह्या अधिनियमाचा उद्देश म्हणजे, घटकांना (फॅक्टर्स) विनियमित करणे व येणे असलेल्या राशी त्या घटकांच्या नावे नेमून देणे (असाईनमेंट) व त्याचप्रमाणे, संबंधित पक्षांचे हक्क व दायित्वेही येणे असलेल्या निधींशी आलेखित करणे.

(२) ह्या अधिनियमाखाली, बँका, इतर घटक कंपन्या, सरकारी कंपन्या, (ह्या अधिनियमाच्या कलम ५ मध्ये दिल्यानुसार) रिझर्व बँकेकडे, एनबीएफसी म्हणून पंजीकृत केल्या जातील व त्यांना रिझर्व बँकेचे प्रुडेंशियल विनियम लागु होतील. वरीलप्रमाणे, एनबीएफसींचा एक नवा प्रकार/वर्ग सुरु करण्याचे ठरविण्यात आले आहे. (उदा. - अबँकीय वित्तीय कंपनी फॅक्टर्स) आणि काटेकोरपणे पालन करण्यासाठी त्यांना वेगळे निदेश देण्याचेही ठरविण्यात आले आहे.

**लघुशीर्षक व सुरुवात**

(३)(१) ह्या निदेशांना, अबँकीय वित्तीय कंपनी घटक (रिझर्व बँक) निदेश, २०१२ असे म्हटले जाईल.

(२) त्या ताबडतोब जारी होतील आणि ह्या निदेशांमधील सुरुवात केल्याची तारीख ही ह्या निदेशांची तारीखच समजली जाईल.

**(४) हे निदेश लागु होणे**

ह्या निदेशातील तरतुदी, फॅक्टरिंग रेग्युलेशन अधिनियम, २०११ च्या कलम ३ खाली, भारतीय रिझर्व बँकेकडे पंजीकृत झालेल्या प्रत्येक अबँकीय वित्तीय कंपनी फॅक्टर लागु होतील.

**(५) व्याख्या**

(१) अधिनियम म्हणजे, फॅक्टरिंग रेग्युलेशन अधिनियम, २०११

(२) बँक म्हणजे, भारतीय रिझर्व बँक अधिनियम, १९३४ च्या कलम ३ खाली स्थापन केलेली भारतीय रिझर्व बँक.

(३) अबँकीय वित्तीय कंपनी फॅक्टर (एनबीएफसी फॅक्टर) म्हणजे, आरबीआय अधिनियम, १९३४ च्या कलम ४५-आयच्या खंड (एक) मध्ये व्याख्या केलेली, व ह्या निदेशांच्या परिच्छेद ६ मध्ये व्याख्या केल्यानुसार मुख्य व्यवसाय असलेली आणि ह्या अधिनियमाच्या कलम ३ च्या पोट कलम (१) खाली पंजीकरण प्रमाणपत्र मिळालेली एक अबँकीय वित्तीय कंपनी.

(४) कंपनी म्हणजे, कंपनीज् अधिनियम, १९५६ च्या कलम ३ खाली पंजीकृत झालेली कंपनी.

(५) ह्यामध्ये वापरण्यात आलेले आणि ह्या अधिनियमात व्याख्या केलेले शब्द व शब्दसमुह ह्यांचा अर्थ, त्यांना ह्या अधिनियमात देण्यात आलेल्या अर्थाप्रमाणेच असेल. ह्या अधिनियमात व्याख्या न केलेले शब्द व शब्दसमुह ह्यांचा अर्थ, आरबीआय अधिनियम, १९३४ मध्ये त्यांना देण्यात आलेल्या अर्थाप्रमाणेच असेल.

(६) **पंजीकरण व त्यासंबंधित बाबी**

(१) फॅक्टरिंगचा व्यवसाय करु इच्छित प्रत्येक कंपनी, ह्या अधिनियमाच्या कलम ३ नुसार, ह्या बँकेकडे, पंजीकरण प्रमाणपत्र (सीओआर)मिळविण्यासाठी अर्ज करील;

(२) ह्या निदेशांमध्ये दिलेल्या सर्व अटी पूर्ण करणा-या विद्यमान एनबीएफसींनी, ह्या अधिसूचनेच्या तारखेपासून सहा महिन्यांच्या आत, ह्या बँकेने त्यांना दिलेल्या मूळ सिओआर सह, त्या पंजीकृत झाल्या आहेत त्या प्रादेशिक कार्यालयाकडे,

एनबीएफसी फॅक्टर म्हणून त्यांचे वर्गीकरण करुन घेण्यासाठी जावे. त्यांच्या अशा विनंतीसोबत, त्यांचे ॲसेट व उत्पन्न दर्शविणारे, वैधानिक ऑडिटर्सचे प्रमाणपत्र देणे आवश्यक आहे.

(३) ह्या बँकेकडे पंजीकृत न झालेली संस्थाही, ती ह्या अधिनियमाच्या कलम ५ मध्ये निर्देशित केलेली संस्था असल्यास (म्हणजे संसदेचा किंवा राज्य विधानसभेचा अधिनियम ह्याखाली किंवा कंपनीज अधिनियम १९५९ च्या कलम ६१७ खाली स्थापन झालेली) फॅक्टरिंगचा व्यवसाय करु शकते.

(४) ह्या बँकेने, एक एनबीएफसी फॅक्टर म्हणून सीओआर दिलेली एखादी नवीन कंपनी, ह्या बँकेने सीओआर दिल्याच्या तारखेपासून सहा महिन्यांच्या आत व्यवसाय सुरु करु शकते.

(७) **निव्वळ निज निधी**

(१) एनबीएफसी फॅक्टर म्हणून पंजीकरण करण्यास इच्छुक असलेल्या प्रत्येक कंपनीजवळ रु. ५ कोटींचा निव्वळ निजनिधी (एनओएफ) असणे आवश्यक आहे.

(२) एनबीएफसी फॅक्टर म्हणून पंजीकरण करण्यास इच्छुक असलेल्या विद्यमान कंपन्या रु. ५ कोटींचा एनओफची आवश्यकता पूर्ण करु शकत नसल्यास, ती आवश्यकता पूर्ण करण्यासाठीच्या कालावधीसाठी, त्या ह्या बँकेकडे येऊ शकतात.

(८) **मुख्य व्यवसाय**

(१) एनबीएफसी फॅक्टर कंपनीने खात्री करुन घ्यावी की, तिचे फॅक्टरिंग व्यवसायातील वित्तीय ॲसेट्स, तिच्या एकूण ॲसेट्सच्या ७५% एवढे असतील आणि अशा फॅक्टरिंग व्यवसायातून मिळालेले उत्पन्न, तिच्या एकूण उत्पन्नाच्या ७५% एवढे असेल.

(२) ह्या बँकेकडे पंजीकरण केलेल्या आणि तिच्या एकूण ॲसेट्सच्या/उत्पन्नाच्या ७५% पेक्षा कमी व्यवसाय करणा-या व विद्यमान एनबीएफसीने ह्या अधिसूचनेच्या तारखेपासून सहा महिन्यांच्या आत, तिची फॅक्टर होण्याचा किंवा व्यवसाय संपूर्णपणे बंद करण्याचा उद्देश व त्या अनुषंगाने तपशीलवार योजना (रोड मॅप) ह्या बँकेकडे सादर करणे आवश्यक आहे. तथापि, अशा एनबीएफसींनी, त्यांची व्यवसायाची/उत्पन्नाची टक्केवारी, वरील ६(१) अनुसार वाढवावी किंवा ह्या अधिसूचनेच्या तारखेपासून २ वर्षांच्या आत त्यांचा फॅक्टरिंग व्यवसाय गुंतवावा. आवश्यक तेवढी ॲसेट/उत्पन्नाची टक्केवारी मिळाल्यानंतरच त्यांना एनबीएफसी-फॅक्टर म्हणून सीओआर दिले जाईल.

कृपया डीबीओडी.बीपी.बीसी. क्र.४०/२१.०४.१७२/२०१२-१३ दि. ११.०९.१२ चा संदर्भ घ्यावा.

(९) **व्यवसाय चलन**

हा अधिनियम आणि त्याच्याखाली केलेले नियम व विनियम ह्यांना अनुसरुनच एनबीएफसी-फॅक्टरांनी त्यांचा फॅक्टरिंगचा व्यवसाय सुरु ठेवावा.

(१०) **प्रुडेशियल नॉर्म्स**

अबँकीय वित्तीय (ठेवी न स्वीकारणा-या किंवा धारण करणा-या) कंपन्या प्रुडेंशियल नॉर्म्स (रिझर्व बँक) निदेश, २००७ किंवा अबँकीय वित्तीय (ठेवी स्वीकारणा-या किंवा धारण करणा-या) कंपन्या प्रुडेंशियल नॉर्म्स (रिझर्व बँक) निदेश, २००७ (एखाद्या कर्ज कंपनीला लागु असेल त्यानुसार) हे एनबीएफसी-फॅक्टर कंपनीलाही लागु होतील.

(११) **रिर्टन्स सादर करणे**

रिझर्व बँकेला रिर्टन्स सादर करणे हे पंजीकृत एनबीएफसींच्या बाबतीत सध्या विहित केल्याप्रमाणेच असेल.

(१२) **आयात/निर्यात फॅक्टरिंग**

रिझर्व बँकेचा विदेशी मुद्रा विभाग (एफ ई डी), फेमा, १९९९ खालील फॅक्टर्सना प्राधिकृतीकरण देतो.  ह्यामुळे, आयात/निर्यात फॅक्टरिंग मार्फत फोरेक्समध्ये व्यवहार करण्यास इच्छुक अशा एनबीएफसी-फॅक्टर्सनी, फेमा १९९९ खाली आवश्यक त्या प्राधिकृतीसाठी, एफईडीकडे अर्ज करावा आणि एफईडीने विहित केलेल्या अटी व शर्ती, आणि फेमामधील तरतुदी किंवा त्याखालील नियम, विनियम, अधिसूचना किंवा आदेश ह्यांचे पालन करावे.

(१३) **संकीर्ण**

(१) अबँकीय वित्तीय (ठेवी न स्वीकारणा-या अथवा धारण न करणा-या) कंपन्या प्रुडेंशियल नॉर्म्स (रिझर्व बँक) निदेश, २००७ आणि अबँकीय वित्तीय (ठेवी स्वीकारणा-या किंवा धारण करणा-या) कंपन्या प्रुडेंशियल नॉर्म्स (रिझर्व बँक) निदेश, २००७ अन्वये, सर्व एनबीएफसींनी, दरवर्षी ३१ मार्च रोजी संपलेल्या आर्थिक वर्षासाठी, त्या कंपनीची स्थिती दर्शविणारे वैधानिक ऑडिटर्सचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.  एखाद्या एनबीएफसी-फॅक्टरसाठी, फॅक्टरिंग अधिनियमाच्या कलम ३ खाली दिलेल्या प्रमाणपत्रात धारणाची आवश्यकता असल्याचे प्रमाणपत्र देणे आवश्यक आहे.  अशा प्रमाणपत्रात, फॅक्टरिंग ॲसेट्स व उत्पन्न ह्यांची टक्केवारी, ती कंपनी एनबीएफसी-फॅक्टर म्हणून वर्गीकृत केली जाण्याबाबत ह्या अधिनियमाखाली विहित केलेल्या सर्व अटींचे त्या कंपनीने पालन केले आहे आणि एफडीआय मिळाला असल्यास, किमान भांडवलीकरण नॉर्म्सचे पालन केले आहे ह्यांचा समावेश असावा.

(२) ह्या निदेशांमधील तरतुदींचे अनुपालन न केले गेल्यास, ह्या अधिनियमाखाली दंड होऊ शकतो.

****